शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद येथे प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजना- फेज-III अंतर्गत बांधण्यात आलेल्या सुपरस्पेशालिटी रुग्णालय इमारतीत विद्युत सबस्टेशन बसविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्रमांक : जीएचए-२०१८/प्र.क्र.४०३/प्रशा-१

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, नविन गो.ते.संकुल इमारत

नवीन मंत्रालय, ९ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग,

मुंबई - ४०० ००१.

दिनांक : १७ जुलै, २०१९

वाचा : संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे क्रमांक : संवैशिवसं/शावैमऔरंगाबाद/विद्युस/सुधारित/सुपरस्पेशॉलिटी/प(आय)/४४७८/१९ दिनांक : ०५.०२.२०१९

शासन निर्णय :-

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद येथे प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजना- फेज-III अंतर्गत नव्याने तयार होणाऱ्या अतिविशेषोपचार रुग्णालयाच्या विद्युतीकरणासाठी विद्युत सबस्टेशन बसविण्याकरीता खालील तक्त्यात दर्शविलेल्या व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सहमती दर्शविलेल्या एकूण रुपये २,३५,१७,५०१/- (रुपये दोन कोटी पसत्तीस लक्ष सतरा हजार पाचशे एक फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास खालील अटीं व शर्तींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	स्थापत्य दुरुस्ती बांधकामाचे नाव	प्रस्तावित केलेली अंदाजित रक्कम रुपये	सा.बां.विभागाने मान्यता दर्शविलेली किंमत रुपये
१	शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद येथे प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजना- फेज-III अंतर्गत बांधण्यात आलेल्या	२,३५,१७,५०१/-	२,३५,१७,५०१/-

अ.क्र.	स्थापत्य दुरुस्ती बांधकामाचे नाव	प्रस्तावित केलेली अंदाजित रक्कम रुपये	सा.बां.विभागाने मान्यता दर्शविलेली किंमत रुपये
	सुपरस्पेशालिटी रुग्णालय इमारतीत विद्युत सबस्टेशन बसविण्याबाबत.		
	एकूण	२,३५,१७,५०१/-	२,३५,१७,५०१/-

अटी व शर्ती :-

१. अंदाजपत्रक सक्षम स्तरावरुन स्वाक्षांकित करुन घ्यावे.

२. तांत्रिक मंजूरी देताना राज्य दरसूचीबाहय बाबींच्या दराकरीता शासन परिपत्रक क्रमांक - २०१७/प्र.क्र.११/नियोजन-३, दिनांक -११.४.२०१७ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

३. प्रस्तावातील खरेदीशी संबंधीत बाबींकरीता ई-निविदा प्रणालीचा अवलंब करुन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दिनांक २४.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या सूचना विचारात घ्याव्यात.

४. प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१ दिनांक १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

५. विषयांकित कामाकरीता सुधारीत प्रशासकीय मान्यतेची आवश्यक लागणार नाही, याद्दष्टीने विशेष दक्षता घेऊन काम करण्यात यावे.

२. सदर काम मंजूर निधीमधून करण्यात यावे व संचालनालयाने नमूद केलेल्या खालील लेखाशीषाअंतर्गत मंजूर तरतूदीतून करण्यात येईल.

मागणी क्रमांक - एच-८
४२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च
०३, वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन,
१०५-विषमचिकित्सा पंचवार्षिक योजनांतर्गत
(४२१० ००४१) ५३- मोठी बांधकामे

३. हा शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला - उप विभाग पाच मधील महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका अंतर्गत परिच्छेदांखाली प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार परिच्छेद क्रमांक १३४ मधील अ.क्र.५ अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान केलेल्या

अधिकारानुसार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ११५/इमा-३ दिनांक २०.०५.२०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७१७१२५९५३४९१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARUN MURLIDHAR RAO DAHALE

Digitally signed by ARUN MURLIDHARRAO DAHALE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, postalCode=400032, street=MANTRALAYA ,MUMBAI, serialNumber=30df743755280cf26ce97ec0978235f63f80f0bc4317129bf381eb48778f2e3d, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ARUN MURLIDHARRAO DAHALE
Date: 2019.07.17 14:45:28 +05'30'

(अ.मु.डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), नागपूर, महाराष्ट्र.
२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद.
४) सार्वजनिक बांधकाम विभाग, (इमारत-३) मंत्रालय, मुंबई.
५) कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद
६) जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद.
७) निवडनस्ती (प्रशा-१)